# :: खरेदीखत ::

**खरेदीखत आज दिनांक ..../०१/२०२४ रोजीचे**

**मौजे –..........., ता. उरण, जि. रायगड येथील**

**भुमापन क्रमांक व उपविभाग – ...........**

**एकूण क्षेत्र ..................... हे.आर.चौ.मी., आकार ......... रू.पै.**

**<u>या मिळकतीचे खरेदीखत</u>**

**१)**
**पॅन क्रं.**
**आधार क्रं.**
वय वर्षे, धंदा–शेती/व्यवसाय
रा. ..................................................
.......................................................
.......................................................

**२)**
**पॅन क्रं.**
**आधार क्रं.**
वय वर्षे, धंदा–शेती/व्यवसाय
रा. ..................................................
.......................................................
.......................................................

} खरेदीखत लिहून घेणार एकपक्षी

यांसी.........

..२..

| | |
|---|---|
| १.<br>पॅन नं. ................................<br>आधार नं.<br>वय वर्षे , भारतीय नागरीक,<br>पत्ता– ..........................................<br>......................................................<br><br>२.<br>पॅन नं. ................................<br>आधार नं.<br>वय वर्षे , भारतीय नागरीक,<br>पत्ता– ..........................................<br>...................................................... | खरेदीखत लिहून देणार<br>दुसरेपक्षी |

कारणे खरेदीखत लिहून देतांत कीं,

सदर खरेदीखत लिहून देणार दुसरेपक्षी यांचे मालकीची व तुकडी व जिल्हा रायगड पोट तुकडी व तालुका उरण तसेच जिल्हा परिषद रायगड व तलाठी सजा ............ यांचे अधिकार क्षेत्रातील **मौजे – .............., ता. उरण जि.रायगड** येथील मिळकत आहे. सदर मिळकतीचे वर्णन रेव्हेन्यु रेकॉर्डनूसार खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – ..........., ता. उरण, जि.रायगड**

| **भुमापन क्रमांक व उपविभाग** | **भुधारणा पध्दती** | **क्षेत्र हे.आर.चौ.मी.** | **आकार रू.पै.** |
|---|---|---|---|
| | | | |

वरील मिळकतीच्या चतु:सिमा पुढीलप्रमाणे आहेत.

पुर्वेस :
पश्चिमेस : सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे
दक्षिणेस :
उत्तरेस :

येणेप्रमाणे वरील मिळकत व त्या मिळकतीमधील झाड–झाडोरा, बांध बंदिस्त, दगड, पाषाण, जल, तरू, काष्ट, वहिवारंग, निधिनिक्षेप, येणे–जाणेचा मार्ग, वगैरे तद्ंगभुत हक्कांसुध्दा अशी वरील मिळकत ही दुसरेपक्षी यांनी या कायम खरेदीखताने एकपक्षी यांस विकत दिलेली आहे.

येणेप्रमाणे चुत:सिमेच्या आतील वरील शेत मिळकतीपासून दुसरेपक्षी यांना काही एक उत्पन्न मिळत नाही दुसरेपक्षी यांनी आपल्या कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी व आर्थिक गरजा भागविण्यासाठी दुसरेपक्षी यांनी आपल्या

कौटुंबिक सर्व वारसांच्या संमतीने व एकपक्षी यांनी मागणी केलेवरून व विंनती केले वरून सदरहू शेतजमिन कायम फरोक्तखताच्या व्यवहाराबद्दल उभयपक्षी यांनी आपआपसांत निश्चित करण्यात आलेल्या शर्ती व अटी खालीलप्रमाणेः—

१) सदरहू मिळकतीची एकूण किंमत रक्कम **रू................/— (अक्षरी रूपये ....................................................... मात्र)** इतकी निश्चित करण्यांत आली असून हि किंमत आजचे चालू बाजारभावाप्रमाणे व त्या परिसरांत चालू असलेल्या दराचे भाव लक्षात घेता योग्य व वाजवी आहे. आणि हि मिळकतीची किंमत उभयपक्षी यांनी मान्य व कबूल केली आहे.

२) येणेप्रमाणे मोबदल्याचे एकूण रक्कम **रू................/— (अक्षरी रूपये ....................................................... मात्र)** रोख /चेक स्वरूपात एकपक्षी यांनी दुसरेपक्षी यांना पावतीत नमूद केल्याप्रमाणे पोच केले आहेत. सदरहू मोबदल्याची काही येणे बाकी नाही व सदरहू रक्कमेबाबत कोणतीही तक्रार नाही असे दुसरेपक्षी यांनी मान्य व कबूल केले आहे.

३) सदर मिळकतीच्या मोबदल्याची संपुर्ण रक्कम आजरोजीपर्यंत पोच झाली असल्यामुळे या खरेदीखतांत उल्लेख केलेल्या मिळकतीचा खुला व शांततामय ताबा कब्जा एकपक्षी यांना दुसरेपक्षी हयांनी आजरोजी या खरेदीखताचेवेळी मालकी हक्काने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या ताबेकब्जाबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

४) सदरहू खरेदीखतांत नमूद केलेली मिळकत ही पुर्णपणे बोजारहित असून ती दुसरेपक्षी यांनी अन्य कोणासही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, दावा, वारसा, इनामी, लिज, लिन, टेनन्सी, अन्नवस्त्र, पोटगी, कब्जा, हवाला, अदला बदल अगर इतर हक्कांत दिलेली नाही. अगर तसा कोणताही तोंडी किंवा लेखी करारही केलेला नाही. तसेच काही आढळून आल्यास अगर त्यामुळे एकपक्षी यांचे काही नुकसान झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी दुसरेपक्षी यांचेवर राहिल. त्याबाबतची कोणतीही तोशिष एकपक्षी यांना राहणार नाही. सदर बाबींचे निवारण दुसरेपक्षी हे स्व:खर्चाने करून देतील.

५) एकपक्षी यांना कायम विकत दिलेली मिळकत ही शेतजमिन दुसरेपक्षी यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जांतील व वहिवाटींतील अशी मिळकत आहे. ही मिळकत रेव्हेन्यु रेकॉर्डला दुसरेपक्षी यांचे नांवावर आहे. हया मिळकतींवर दुसरेपक्षी यांचे शिवाय अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नव्हता व नाही. एकपक्षी यांनी आपल्या वकिलांमार्फत शोध घेवून तसेच जाहिर नोटीस प्रसिध्द करून दुसरेपक्षी यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेतलेली आहे. तरीसुध्दा हया कायम खरेदीखतानंतर एकपक्षी यांचेबरोबर अन्य कोणीही हया मिळकतीच्या मालकी हक्काबाबत दंग दावा, हिस्सा, हरकत सांगु लागल्यांस त्याचे निवारण दुसरेपक्षी यांनी आपले पदरखर्चाने करून एकपक्षी यांचा मालकी हक्क खरा करून देणेचा आहे.

६) खरेदीखत लिहून घेणार धारण करत असलेले क्षेत्र व या दस्ताऐवजामध्ये खरेदी घेत असलेले क्षेत्र असे एकूण क्षेत्र महाराष्ट्र कमाल धारणा कायदयान्वये विहित केलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र धारण करीत नाही.

७) वर खरेदीखतांत उल्लेख केलेली मिळकत ही सरकारी, निमसरकारी किंवा अन्य कोणत्याही संस्थेकरीता, सिडको, एम.आय.डी.सी. करीता किंवा कोणत्याही कारणांकरीता ॲक्विझिशन, रिक्वीझिशन अगर रिझर्व्हेशन झालेली नाही. अगर तशी नोटीसही दुसरेपक्षी यांना आजमितीस प्राप्त झालेली नाही. अगर तसे नोटीफिकेशनही निघालेले नाही. खरेदीखतासमयी तसे काही आढळून आल्यांस आणि त्यामुळे एकपक्षी यांचे काही नूकसान झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी दुसरेपक्षी यांचेवर राहिल.

८) हया खरेदीखतांत उल्लेखिलेली मिळकतीबाबत ७/१२ चे उतारे, जमिनीचा गटबुकाचा नकाशा, खाते पुस्तिका वगैरे रेव्हेन्यु रेकॉर्ड संबंधी असणारी सर्व कागदपत्रे दुसरेपक्षी यांनी एकपक्षी यांच्या भोगवटयांस आजरोजी ताब्यांत दिलेली आहेत. तसेच सदर मिळकतीचे ७/१२ सदरी लिहून घेणार एकपक्षी यांचे नांवाची नोंद होणेकरीता आवश्यक ते जाबजबाब व सहया लिहून देणार दुसरेपक्षी हे कांहीही तक्रार न करतां देतील.

९) हया खरेदीखतांत उल्लेखिलेली मिळकतीचे आजपासून तुम्ही (एकपक्षी) मालक झाला असल्यामुळे तुम्ही सदर मिळकतीचा उपभोग आपल्या मनाजोगे, पुत्रपौत्रादी, वंशपरंपरेने घेत जावा हया मिळकतीचा धारा, कर, सरकारी,

निमसरकारी वगैरे कर आम्ही आजपर्यंत भरलेले आहेत. यापुढे सदर मिळकतीचा धारा, कर, सरकारी निमसरकारी कर वगैरे एकपक्षी यांनी भरावयाचे आहेत व या मिळकतीचा उपभोग त्यांनी बिनातक्रार घेणेचा आहे.

१०) सदरहू मिळकत ही शेतजमिनीची मिळकत आहे. एकपक्षी हे शेतकरी आहेत. सबब हया खरेदीखतांस कोणत्याही कायदयाची जरूरी नाही किंवा कोणतीही अडचण येत नाही.

११) तसेच या खरेदीखांत ज्या ज्या ठिकाणी **'सदरहू मिळकत'** असे संबोधिले असेल त्या त्या ठिकाणी एकपक्षी यांस वर उल्लेखीलेली खरेदीखतांतील मिळकत विकत दिलेली आहे, असे समजण्याची आहे.

१२) हे खरेदीखत दुसरेपक्षी यांचे वालीवारस, हितसंबंधी, हक्कदार तसेच एक्झिक्युटर्स, ॲडमिनिस्ट्रेटर्स वगैरे सर्वांवर बंधनकारक राहील.

येणेप्रमाणे हे खरेदीखत दुसरेपक्षी यांनी आपले राजीखूशीने व स्वसंतोषे कुणाच्याही दबावाला बळी न पडतां किंवा नशापाणी न करतां, वाचून, समजावून घेऊन लिहून दिले आहे. ते त्यांनी वाचून व समजावून घेवून त्याचे सत्यतेसाठी खालील साक्षिदारांसमक्ष आज तारीख मजकूरी उरण येथे सहया केल्या आहेत.

येणेप्रमाणे खरेदीखत लिहून दिले असे.

साक्षीदार :—　　　　　　　　　　　　सहया/—

१.

२.

१.

२.

खरेदीखत लिहून देणार दुसरेपक्षी

१)

२)

खरेदीखत लिहून घेणार – एकपक्षी

# —: पा व ती :—

कारणे पावती लिहून देतो कीं, एकपक्षी यांचेकडुन रक्कम **रू.** ............ ......./— **(अक्षरी रूपये** ............................................................ **मात्र)** खरेदीखतात वर्णन केल्याप्रमाणे पोहोच झाले आहेत. वरील मिळकतीचे व्यवहारापोटी काही येणे शिल्लक नाही. त्याचे सत्यतेसाठी ही पावती लिहून दिली.

| **रक्कम रू** | **चेक नं.** | **दिनांक** | **बॅकेचे नाव** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| **रू. ................** | **(अक्षरी रूपये ........................................... मात्र)** | | |

येणेप्रमाणे पावती लिहून दिली असे

साक्षीदार :— सही/—

१.

१.

२.
पावती लिहून देणार दुसरेपक्षी

# :: ताबा पावती ::

**मौजे – ............, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकतीची ताबापावती**

| | |
|---|---|
| **१)**<br>**पॅन क्रं.**<br>**आधार क्रं.**<br>वय वर्षे, धंदा–शेती/व्यवसाय<br>रा. ..................................................<br>.......................................................<br>.......................................................<br><br>**२)**<br>**पॅन क्रं.**<br>**आधार क्रं.**<br>वय वर्षे, धंदा–शेती/व्यवसाय<br>रा. ..................................................<br>.......................................................<br>....................................................... | ताबापावती लिहून घेणार<br>एकपक्षी |

यांसी.........

| | |
|---|---|
| **१.**<br>पॅन नं. ................................<br>आधार नं.<br>वय वर्षे , भारतीय नागरीक,<br>पत्ता– ..........................................<br>...................................................... | ताबापावती लिहून देणार<br>दुसरेपक्षी |

| | |
|---|---|
| २.<br>पॅन नं. ................................<br>आधार नं.<br>वय वर्षे , भारतीय नागरीक,<br>पत्ता— ..........................................<br>....................................................... | ताबापावती लिहून देणार<br>दुसरेपक्षी |

कारणे ताबा पावती लिहून देतो की...

कारणे ताबा पावती लिहून देतो की, **मौजे— ............, ता.उरण, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे/माझे ताबे कब्जा वहिवाटीची आहे. तिचे वर्णन खालील प्रमाणे :—

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे — ............, ता. उरण, जि.रायगड**

| **भुमापन क्रंमाक व उपविभाग** | **भुधारणा पध्दती** | **क्षेत्र हे.आर.चौ.मी.** | **आकार रू.पै.** |
|---|---|---|---|
| | | | |

वरील मिळकती ही आम्ही/मी लिहून घेणार यांना कायम स्वरुपी विकत दिली असून सदर जमिनीचा ताबाकब्जा आजरोजी  या ताबे पावती द्वारे देत आहे त्यास आमची/माझी कोणत्याही प्रकारची हरकत / तक्रार नाही.

सदर मिळकतीचा ताबा कब्जा व उपभोग आज पासुन लिहून घेणार यांनी घेणेचा आहे. ही ताबा पावती उभयपक्षी यांचे वालीवारस, हितसंबंधी, हक्कदार तसेच एक्झिक्युटर्स, ॲडमिनिस्ट्रेटर्स वगैरे सर्वांवर बंधनकारक राहील.

येणेप्रमाणे हे ताबापावती दुसरेपक्षी यांनी आपले राजीखूशीने व स्वसंतोषे कुणाच्याही दबावाला बळी न पडतां किंवा नशापाणी न करतां, वाचून, समजावून घेऊन लिहून दिले आहे. ते त्यांनी वाचून व समजावून घेवून त्याचे सत्यतेसाठी खालील साक्षिदारांसमक्ष आज तारीख मजकूरी उरण येथे सहया केल्या आहेत.

साक्षीदार :— सही/—

१.

१.

२.

२.

ताबापावती लिहून देणार दुसरेपक्षी

१)

२)
ताबापावती लिहून घेणार – एकपक्षी